(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 26.04.2023

# एस. एन. मोर महाविद्यालयात विद्यार्थिनींची सिकलसेल, हिमोग्लोबिन, थायरॉईड, सीबीसी तपासणी शिबीर

गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालयात दिनांक २४/०४/२०२३ रोजी विद्यार्थिनींची सिकलसेल, हिमोग्लोबिन, थायरॉईड, सीबीसी तपासणी शिबिर घेण्यात आले. एस. एन. मोर महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभाग व महिला विकास केंद्र तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी एस. एन. मोर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम म्हणाले की २०४७ पर्यंत भारतातून सिकलसेल हद्दपार करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. सिकलसेल हा अनुवांशिक आजार आहे. अनुवांशिकतेने हा आजार पुढील पिढीत संक्रमित होतो. हा दीर्घकाळ चालणारा आजार आहे. लग्न जुळवीत असतांना मुलगा आणि मुलगी दोघांनीही सिकलसेल रक्ताची तपासणी करूनच लग्न जुळवावीत. त्यामुळे पुढील संभाव्य धोका टाळता येऊ शकेल असे ते बोलतांना म्हणाले. याप्रसंगी तुमसर येथील सुभाषचंद्र बोस उपजिल्हा रुग्णालय येथून आलेल्या सिकलसेल टेक्निशियन रीना वैद्य यांनीही विद्यार्थिनींना सिकलसेल या आजाराविषयी सांगितले. या प्रसंगी त्या म्हणाल्या या आजारावर ठोस उपाययोजना अजून तरी नाही. हा आजार कसा होतो? हे त्यांनी समजावून सांगितले. डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घेऊन आजाराची लक्षणे, दुखणे कमी करता येते. उपचारांचा मुख्य उद्देश आणखी समस्या वाढू नये हा असतो. याप्रसंगी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक यांनीही हा रोग किती वेदनादायी आहे हे समजावून सांगितले.

या शिबिराला हिंद लॅब टीम सी.बी.सी. तपासणी, एल.सी.डी. टीम, सिकलसेल तपासणी सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालय, तुमसर येथील चमूने विद्यार्थिनींची तपासणी केली. यासाठी टेक्निशियन जयमाला ठवकर यांचे सहकार्य लाभले. या शिबिरास महाविद्यालयातील जवळपास १२० विद्यार्थिनींनी तपासणी करून घेतली.

याप्रसंगी सूत्रसंचालन डॉ. सुनिता राठोड तर आभार प्रदर्शन प्रा. आरती साळवे यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. बावनकर, डॉ. पराते, डॉ. ठाकूर, डॉ. नासीरे, डॉ. बेलोकार, डॉ. भगत, डॉ. वेरुळकर, डॉ. उबाळे यांचे सहकार्य लाभले.


GPS Map Camera
Tumsar, Maharashtra, India
9PPR+WXP, Shastri Nagar, Tumsar, Maharashtra 441912, India
Lat 21.387294°
Long 79.742124°
24/04/23 11:31 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Tumsar, Maharashtra, India
9PPR+WXP, Shastri Nagar, Tumsar, Maharashtra 441912, India
Lat 21.387294°
Long 79.742122°
24/04/23 11:32 AM GMT +05:30
Google


गृहअर्थशास्त्र विभाग
महिला विकास केंद्र
GPS Map Camera
Tumsar, Maharashtra, India
9PPR+WXP, Shastri Nagar, Tumsar, Maharashtra
441912, India
Lat 21.387301°
Long 79.742133°
24/04/23 11:50 AM GMT +05:30
Google


गृहअर्थशास्त्र विभाग
महिला विकास केंद्र
GPS Map Camera
Tumsar, Maharashtra, India
9PPR+WXP, Shastri Nagar, Tumsar, Maharashtra 441912, India
Lat 21.387424°
Long 79.742151°
24/04/23 12:28 PM
Google
©2023 Google


गृहअर्थशास्त्र विभाग
महिला विकास केंद्र
GPS Map Camera
Tumsar, Maharashtra, India
9PPR+WXP, Shastri Nagar, Tumsar, Maharashtra 441912, India
Lat 21.387403°
Long 79.742157°
24/04/23 12:28 PM
Google
©2023 Google